११ ते १७ डिसेंबर दरम्यान सिकलसेल आजार जनजागृती सप्ताह >>पान 2

समाज कंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन फाशीची शिक्षा >>पान 3

आमदार सिद्धार्थ खरात जिजाऊ चरणी नतमस्तक, आमदारकीचे ओळखपत्र बॅच जिजाऊ चरणी अर्पण >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

सुविचार
लहान आनंदाचे क्षण मोठा आनंद देतात.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 121 ■ गुरूवार, दि. 12 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



किशोरी शहाणेंचा वरुण धवनच्या गाण्यावर एनर्जेटिक डान्स, नेटकरी करतायत कौतुक
आतील पान

## २०१९ आणि २०२२ पेक्षा मोठा राजकीय भूकंप?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्रामध्ये २०१९ साली झालेला पहाटेचा शपथविधी तसेच २०२२ साली शिवसेनेमध्ये पडलेली उभी फूट या दोन्ही नाट्यमय घटना आजही राज्यातील प्रत्येकाच्या लक्षात आहेत. मात्र या दोन्ही घटनांपेक्षाही मोठा राजकीय भूकंप लवकरच राज्यात होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यात सहा महिन्याच्या अंतराने पार पडलेल्या लोकसभा आणि विधानसभेच्या निकालांमध्ये अगदी परस्पर विरोधी निकाल लागल्याचं पाहायला मिळालं आहे. लोकसभेला महाराष्ट्राच्या जनतेनं महाविकास आघाडीच्या पारड्यात मत दिलं. तर दिवाळीनंतर पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या आघाडीला घवघवीत यश मिळालं. या निकालानंतर सत्ताधाऱ्यांचा आत्मविश्वास बराच वाढला आहे. असं असतानाच आता भाजपाकडून राज्यामध्ये मोठी राजकीय खेळी केली जाईल अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे महाविकास आघाडी आणि भाजपामधील संघर्ष शिगेला पोहचण्याची शक्यता व्यक्त केली जातेय.**




लवकरच ऑपरेशन लोटस?

महाराष्ट्रामध्ये लवकरच भाजपाकडून ऑपरेशन लोटस राबवलं जाण्याची दाट शक्यता आहे. यासंदर्भातील काही धक्कादायक खुलासे भाजपाच्या वरिष्ठ नेत्याने केल्याचं सांगितलं जात आहे. महाविकास आघाडीचे काही खासदार भारतीय जनता पार्टीच्या संपर्कात असल्याचं या बड्या नेत्याचं म्हणणं आहे. लवकरच हे खासदार भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती सदर नेत्याने दिली आहे. मात्र हे खासदार भाजपामध्ये प्रवेश करणार म्हणजेच त्यांना त्यांच्या विद्यमान खासदारकीचा राजीनामा द्यावा लागेल. त्यामुळेच अवघ्या सहा महिन्यांपूर्वी निवडून आलेले कोणते खासदार भाजपामध्ये जाण्यासाठी आपल्या खासदारकीचा राजीनामा देणार हे पाहाणं महत्त्वाचं ठरणार आहे. असं झालं तर हा २०१९ च्या राजकीय नाट्यापेक्षा मोठी घडामोड असेल असं मानलं जात आहे.

सध्या राज्यात कोणाचे किती खासदार?

भाजपाच्या या ज्येष्ठ नेत्याने केलेल्या दाव्यानुसार, विधानसभेच्या निकालानंतर महाविकास आघाडीमधील खासदारांमध्ये अस्वस्थता असल्याची चर्चा आहे. मात्र हे खासदार नेमके कोण यासंदर्भातील कोणतीही माहिती समोर आलेली नाही. लोकसभेतील सर्वाधिक खासदार संख्या असलेल्या राज्यांच्या यादीत महाराष्ट्र उत्तर प्रदेश खालोखाल दुसऱ्या स्थानी आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण ४८ खासदार आहेत. २०२४ साली एप्रिल-मे महिन्यांमध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी ३० जागांवर विजय मिळवला. यापैकी काँग्रेसने सर्वाधिक १३ जागा जिंकल्या. काँग्रेसबरोबर महाविकास आघाडीत निवडणूक लढणाऱ्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच ९ खासदार निवडून आले. तसेच शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने लढवलेल्या १० जागांपैकी त्यांनी ८ खासदार निवडून आणले. दुसरीकडे भाजपाला ९ जागी विजय मिळाला. शिंदेंच्या शिवसेनेनं ७ जागी तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला केवळ एका जागी विजय मिळवता आला. एक अपक्ष उमेदवार जिंकून आला.

कोणाला किती टक्के मतं?

मतांच्या टक्केवारीचा विचार केल्यास भाजपाला एकूण मतदानाच्या २६.१८ टक्के मतं मिळाली. सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला १६.९२ टक्के मतं मिळाली. तसेच शरद पवारांच्या राष्ट्रवादीला १०.२७ टक्के तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ३.६० टक्के मतं मिळाली. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला १६.७२ टक्के मतं मिळाली. तसेच शिंदेंच्या शिवसेनेला लोकसभेमध्ये १२.९५ टक्के मतं मिळाली.

## ज्यांना 'जय श्रीराम' चा त्रास होतो, त्यांना पाकिस्तानात रवाना करा!

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** जम्मू काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांच्या कन्या इल्तिजा मुफ्ती यांनी हिंदुत्व हा एक आजार आहे, असे वक्तव्य नुकतेच केले.



या वक्तव्यामुळे इल्तिजा मुफ्ती चर्चेत आल्या आहेत. त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर टीकाही होते आहे. आता भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी इलतिजा मुफ्तीवर घणाघात केला आहे.

''ज्यांना जय श्रीरामच्या नाऱ्याचा त्रास होतो, ज्यांना हिंदुत्वाविषयी द्वेष आहे, त्यांना सरकारने पाकिस्तानात पाठवून द्यावे'', असे नवनीत राणा यांनी म्हटले आहे. 'मेहबुबा मुफ्ती यांच्या कन्या इल्तिजा मुफ्ती यांनी हिंदुत्व हा एक आजार आहे, हिंदुत्व आणि हिदूइझम मध्ये खूप अंतर आहे, असे वक्तव्य केले आहे. आता हिंदुस्तानात राहणाऱ्या सर्व हिंदूंना आता हिंदूइझम काय आहे, हे मेहबुबा मुफ्ती यांच्या मुलीकडून शिकावे लागणार आहे.

मी केंद्र सरकारला देशातील सर्व हिंदू लोकांच्या वतीने हात जोडून विनंती करते की, ज्यांचा जन्म या हिंदुस्थानच्या भूमीवर झाला आहे. त्यांना स्वातंर्त्यवीर सावरकर यांच्या विषयी द्वेष वाटत असेल, हिंदू आणि हिंदूइझमपासून त्रास होत असेल, जय श्रीराम या नाऱ्याचा त्रास असेल, तर या सर्व लोकांना पाकस्तिानात पाठवावे. कारण हा हिंदुस्तान आहे, या ठिकाणी जय श्रीरामचे नारे देखील लागतील, हिंदू आपले उत्सव देखील उत्साहाने साजरे करतील. ज्यांना हिंदुस्तानाविषयी द्वेष आहे, ते पाकिस्तानातून जाऊ शकतात, अशी टीका नवनीत राणा यांनी केली आहे.

## संजय राऊतांच्या सख्ख्या भावाची फेसबुक पोस्ट चर्चेत, डिलीट केलेली पोस्ट समोर

**मुंबई/प्रतिनिधी :** ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या भावाने केलेल्या पोस्टमुळे राजकीय चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले आहे. संजय राऊत यांचे सख्खे भाऊ संदीप उर्फ अप्पा राऊत यांनी आज फेसबुकवर एक पोस्ट केली. यानंतर काही वेळातच ती डिलिट केल्याचं दिसून आले. मात्र संदीप राऊत यांनी केलेल्या पोस्टचा स्क्रीनशॉट सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. दरम्यान संदीप राऊत हे भारतीय कामगार सेनेचे पदाधिकारीही आहेत.

संदीप उर्फ अप्पा राऊत यांनी फेसबुकवर पोस्ट करत शिवसेना ठाकरे गटात एकनिष्ठ शिवसैनिकांवर अन्याय होत असल्याची भावना व्यक्ती केली. नेत्यांपुढे पुढं-पुढं करणाऱ्यांनाच पक्षात पद मिळत असल्याचा केला आरोप संदीप राऊत यांनी आपल्या पोस्टद्वारे केला आहे. ही पोस्ट संदीप राऊत यांनी थोड्यावेळेनंतर डिलीट केली होती. त्यामुळे राऊतांच्या घरात नेमकं चाललंय काय?, असा सवालही उपस्थित करण्यात येत आहे.

## गुलाबराव पाटील ते दीपक केसरकर, मंत्रिमंडळात स्थान नको, शिवसेना आमदारांचाच विरोध

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने मोठ्या प्रमाणावर यश मिळवलं. तर माहाविकास आघाडीला मोठा फटका बसला. राज्यात पुन्हा एकदा महायुती सरकारने आपली सत्ता स्थापन केली आहे. राज्याच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंर्त्याचा शपथविधी सोहळा देखील पार पडला. त्यानंतर आता राज्याचं लक्ष लागलं आहे ते मंत्रिमंडळाचा विस्ताराकडे. कोणत्या पक्षाला कोणतं मंत्रीपद मिळणार याकडे आमदारांसह राज्याचं लक्ष लागलं आहे. अशातच घडामोडींना वेग आला आहे. हिवाळी अधिवेशनाआधी मंत्रीमंडळ विस्तार होणार असल्याची माहिती आहे, त्या अनुषंगाने राज्यात मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत, त्यासाठी महायुतीचे तिन्ही नेते आज दुपारी दिल्लीला रवाना होणार असल्याची माहिती आहे, तर दुसरीकडे पक्षात मंत्रीपदासाठी रस्सीखेच सुरू झाली असून गुलाबराव पाटील, दीपक केसरकर यांच्यासह काही अन्य आमदारांना मंत्रिमंडळात स्थान नको असं म्हणत शिवसेनेच्यात आमदारांनी विरोध दर्शवला आहे.

मंत्रिमंडळा विस्तार होणं अद्याप बाकी असून अनेक माजी मंर्त्याचे एकनाथ शिंदेंच्या निर्णयाकडे लक्ष असताना आता पक्षातच मंत्रीपदासाठी रस्सीखेच सुरू झाली आहे. शिंदेंच्या पक्षातील आमदारांकडूनच काही माजी मंर्त्यांना विरोध होताना पहायला मिळतोय. मंत्रिमंडळात काही माजी मंर्त्यांना स्थान देऊ नका अशी चर्चा आमदारांमध्ये रंगू लागली आहे. यामध्ये माजी मंत्री अब्दुल सत्तार, दिपक केसरकर, तानाजी सावंत, दादा भुसे, गुलाबराव पाटील, संजय राठोड यांच्या नावाचा समावेश आहे. या नेत्यांकडे गेल्यावर कामचं होत नाही. हे नेते केवळ आश्वासनं देतात प्रत्यक्षात कामं होत नसल्याचा आरोप आमदार खासगीत करतात अशी माहिती आहे. तर माजी मंत्री अब्दुल सत्तार यांच्या नावाला तर शिवसेना आमदारांपाठोपाठ भाजप आमदारांचाही विरोध असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## १५ वर्षाच्या मुलीचं जबरदस्तीने लग्न, गर्भवती राहिल्यानंतर प्रकरण उघडकीस, पती-पत्नीच्या आई वडिलांवर गुन्हा

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर जिल्ह्यातील बार्शीमध्ये क्रूरतेचा कळस झाल्याचं दिसून आलंय. १५ वर्षाच्या मुलीशी जबरदस्तीनं लग्न करत तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. अल्पवयीन मुलीसोबत बळजबरीने विवाह करत तिच्यावर अत्याचार केल्याने बार्शीत पतीसह आई वडील आणि सासू सासऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. मुलगी गर्भवती राहिल्यानंतर हा सगळा प्रकार उघडकीस आला. मध्य प्रदेशमध्ये राहणारा हा आरोपी बार्शीत मजूरीचे काम करायचा.

आपली मुलगी १५ वर्ष अकरा महिन्यांची झाल्याचे समजताच मुलीच्या आई वडिलांनी मजूरीचे काम करणाऱ्या तरुणाशी आपल्या १५ वर्षीय मुलीचं जबरदस्तीनं लग्न लाऊन दिलं. या विवाहला मुलीने विरोध केला होता. मात्र त्यानंतर ही २७ एप्रिल २०२४ रोजी बळजबरीने विवाह करण्यात आला. मुलगी अल्पवयीन असल्याचे माहिती असताना देखील पतीने तिच्यावर वारंवार अत्याचार केले. पोटदुखीचा त्रास होऊ लागल्यानं मुलीला बार्शीत खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आलं. त्यावेळी तपासात अल्पवयीन मुलगी गर्भवती असल्याचं लक्षात आलं. त्यानंतर अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून पतीसह सासू सासरे आणि मुलीच्या आई वडिलांसह पाच जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. .

पोक्सोअंतर्गत पाच जणांवर गुन्हे

या घटनेनंतर महाराष्ट्र हादरला आहे. आपल्या १५ वर्षाच्या मुलीचं लग्न लावून देणाऱ्या आई वडिलांसह पीडित मुलीच्या पतीसह सासू सासऱ्यांवरही पोक्सो आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या कलमांअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. अल्पवयीन मुलीसोबत बळजबरीने विवाह करत अत्याचार केल्याने मुलगी गर्भवती राहिली. पोट दुखू लागल्याने मुलीस बार्शीत एका खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले. तपासाअंतर्गत मुलगी गर्भवती राहिल्याचं डॉक्टरांच्या लक्षात आलं. यानंतर हा सगळा प्रकार उघडकीस आला. मूळचा मध्यप्रदेश येथील असलेल्या आणि सध्या बार्शीत मजुरीचे काम करत असलेल्या एका तरुणाचा विवाह बार्शीतील एका अल्पवयीन मुलीशी करण्यात आला. मुलगी १५ वर्ष ११ महिन्यांची असल्याचे माहिती असताना देखील मुलीच्या आई वडील आणि मुलाच्या आई वडिलांनी हा विवाह केला. या विवाहला मुलीने विरोध केला होता. मात्र त्यानंतर ही २७ एप्रिल २०२४ रोजी बळजबरीने विवाह करण्यात आला. मुलगी अल्पवयीन असल्याचे माहिती असताना देखील पतीने तिच्यावर वारंवार अत्याचार केले. पोटदुखीच्या त्रासामुळे तिला बार्शीत खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. यावेळी तपासणीत अल्पवयीन मुलगी गर्भवती असल्याचे उघड झाले. त्यानंतर अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून पती, सासू-सासऱ्यासह आई वडील अशा एकूण पाच जणांच्या विरोधात पांगरी पोलिसात पोक्सो आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या कलमाअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आलाय.

## विधानसभा निवडणुकीत आप स्वबळावर लढणार

नवी दिल्ली : इंडिया आघाडीतील मतभेद पुन्हा समोर आले आहेत. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचं जाहीर केले. त्यामुळे काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत स्वतंत्र लढावे लागणार आहे.

नवी दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप-काँग्रेसची युती होणार असल्याच्या राजकीय चर्चांवर भूमिका स्पष्ट केली. आम आदमी पक्ष दिल्लीत स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याचं त्यांनी एक्स मीडियातील पोस्टमध्ये म्हटलं.



अरविंद केजरीवाल यांनी द मीडियातील पोस्टमध्ये म्हटले, ''आम आदमी पक्ष दिल्लीत स्वबळावर निवडणूक लढविणार आहे. काँग्रेससोबत कोणत्याही प्रकारची युती होण्याची शक्यता नाही''. मंगळवारी राष्ट्रवादीचे (एसपी) अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीची मंगळवारी बैठक झाली. त्यानंतर काँग्रेस आणि आपमध्ये युती होईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, आज अरविंद केजरीवाल यांनी पुन्हा एकदा दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप एकट्यानंच लढणार असल्याची भूमिका स्पष्ट केली आहे.

आम आदमी पक्षानं दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आतापर्यंत उमेदवारांच्या दोन याद्या जाहीर केल्या आहेत. पहिल्या यादीत पक्षानं ११ जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. तर दुसऱ्या यादीत सोमवारी २० जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. आम आदमी पक्षाकडून दिल्लीत विधानसभा निवडणुकीचा जोरदार प्रचार सुरू आहे. केजरीवाल हे जनतेमध्ये जाऊन त्यांचे मत जाणून घेत आहेत.

## धर्मावर योजना चालवायच्या असतील तर तसे जाहीर करावे

### नाना पटोले यांचे सरकारला आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका या देशातील लोकशाही धोक्यात आलेली आहे, तीच परिस्थिती सध्या भारतात पाहायला मिळत आहे, योजना धर्मावर चालत नसून धर्मावर योजना चालवायच्या असतील तर तसे सरकारने जाहीर करावे, धार्मिक तेढ निर्माण करून हिंदूंच्या कार्यक्रमात बोलावून देशातील एकात्मतेला धोका निर्माण केला जात आहे, अशी उपरोधिक टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी माध्यमांशी बोलताना केली.

यावेळी ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राच्या निवडणुकीत जनभावना पाहिल्या आहेत. हे सरकार जनभावनेचे नाही अशी महाराष्ट्रात चर्चा आहे.अनेक गावांमध्ये ग्रामसभेचे ठराव घेणे सुरू आहेत.मारकडवाडीच्या घटनेची चर्चा जागतिक पातळीवर सुरू आहे. सभागृहात पहिल्या दिवशी अभिनंदन प्रस्तावर अभिनंदन बाजुला ठेवून राजकीय भाषण केल्याचे पाहिले.यावरुन राजकीय माज दिसून आला. मी निवडून आलो नाही असं एका आमदाराने शपथ घेताना म्हटले, सत्तापक्षातील आमदार स्वतःलाच चिमटे घेऊन बघतायत की खरच निवडून आलो का ? देशात विरोधीपक्ष नसावा, केवळ सत्तापक्षा असावा असे हे कृत्य आहे. त्यामुळे लोकसभेत हे सुरू आहे. संघ आणि भाजपचे स्वातंत्र्य लढ्यात योगदान



नसल्याने भ्रष्टाचाराच्या माध्यमातून देश विकून एका माणसाला श्रीमंत बनवण्याचा काम सुरू आहे. पैशाचा भरवश्यावर लोकशाही विकत घेत आहेत. शपथ विधीत कोण जवळ दखवण्याचा प्रयत्न असा प्रश्र्न केला असता अजित पवार, शिंदे यांना भाजप कळलीत नाही, हळू हळू कळेल त्यांचा सुखी संसार राहावा ही इच्छा आहे असा चिमटा घेतला.

राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे, आम्ही या अधिवेशनात काँग्रेसचा गटनेता पाहायला मिळेल, नागपूर अधिवेशनापर्यंत काय होईल ते पाहायला मिळेल, हायकमांड जे नाव पाठवेल त्यावर गटनेता होईल असे मत गटनेता निवडीवर व्यक्त केले.

अदानी फडणवीस भेट याबाबत बोलताना लाभार्थ्यांची आता लाईन लागली आहे, त्यावर प्रतिक्रिया देणार नाही असे सांगितले.

मारकडवाडी ईव्हीएम कोर्टात जाणार याबाबत बोलताना मारकडवाडीतील घटनेनंतर हे सुरू झाले, लोकांनी ठराव घ्यायला सुरुवात केली आहे. पण लोकांचा आवाज दाबण्याचं काम सुरु आहे.उत्तर प्रदेश सरकारने तर मोर्चा काढायचा नाही असा फतवा काढला आहे, महाराष्ट्रात मोर्चे काढायला गेले तर १५३ चे गुन्हे दाखल केले जातात अघोषित आणीबाणी आणली जात आहे, एमएसपीसाठी शेतकरी यांच्यावर लाठीचार्ज केला जात आहे, मोर्चा काढण्याचा अधिकार असताना ते मान्य केले जात नाही आहे, मतदान झाल्यावर गुलाम आहे, असं वाटत असेल तर धोकादायक आहे निवडणूक आयोगाने गडबड केली, आम्ही उत्तर मागितले तर ते निवडणूक आयोगाने वेबसाईटवरुन काढून टाकली, रात्रीच्या अंधारात लोकशाही संपवण्याचा पाप झाले, आम्ही कोर्टात जाऊ असा इशाराही त्यांनी दिला.रायगड जिल्ह्यात एका गावात आंदोलन झाले, ज्या ठिकाणी चिठ्ठी निघते ती बाहेर आली पाहिजे, ती आम्ही पाहून पेटीत टाकू, अशी व्यवस्था करा, अनेक डेमो आले, त्यामुळे शंका दूर करण्याचे काम केले पाहिजे.

सरकारला आता जे काय करावे ते त्यांनी करावे, लवकर मंत्रिमडळ करुन जनतेला न्याय द्यावा, सत्तेतील सगळ्यांचे निर्णय दिल्लीत होतात, सर्वच पक्षाचे अंतिम नेते आता अमित शाहाच झाले आहेत.

नितेश राणे-मुस्लिम महिला याबाबत प्रश्र्न उपस्थित केला असता योजना धर्मावर चालत नाही, धर्मावर योजना चालवायच्या असेल तर जाहीर करावे, या लोकांना मस्ती आली आहे, ही धार्मिक तेढ निर्माण करून हिंदूंच्या कार्यक्रमात बोलावून देशातील एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे, लोकांनी असे बोलणं टाळावे असे आवाहन केले.महाराष्ट्र खड्डेमय झाला, फडणवीस यांना खड्डेमुक्त करण्याची जबाबदारी दिली आहे.

हिवाळी अधिवेशन एक महिना चालावे अशी मागणी केली, कर्जमाफी, शेतकरी आत्महत्या, सरसकट कर्जमाफी यावर चर्चा व्हावी,एमएसपी महाराष्ट्रामध्ये द्यावी, दीड लाख पद भरणार यावर चर्चा अधिवेशनात झाली पाहिजे, महागाई कशी कमी करणार, बहुमत असताना सरकार का पळ काढत आहे ? लाट सुरु आहे तुमची पण लाट कशाची आहे हे कळत नाही. आमचे मित्र देवेंद्र फडणवीस यांना खड्डे भरण्याची ताकद मिळावी महाराष्ट्राची संस्कृती जपण्याचे काम आम्ही करतोयस, वैचारीक लढाई वेगळी असली तरी संबंध कायम ठेवायचे, आमची मैत्री लपलेली नाही, आमचे म्हटले म्हणून ते आमच्या पक्षात येणार आहेत का ? - पुरावे द्यावे लागतात, फडणवीस वकील आहेत त्यांना उत्तरं द्यावी लागतात असे मत यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केले.

## वाढदिवस दक्षिणेतील देवाचा

दक्षिणेतील देव अशी ओळख असलेले सुपरस्टार रजनीकांत यांचा आज ७४ वा वाढदिवस. सुपरस्टार रजनीकांत यांच्या शिरपेचात तीन वर्षांपूर्वी एक मानाचा तुरा रोवला गेला होता. रजनीकांत यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च अशा मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने दोन वर्षापूर्वी गौरविण्यात आले होते. ६७ व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार सोहळ्यात तत्कालीन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते त्यांना या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. रजनीकांत यांना यापूर्वी पद्मभूषण (२०००) व विद्मविभूषण (२०१६) या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. जिवंतपणीच आख्यायिका बनलेले रजनीकांत हे एक अवलिया व्यक्तिमत्त्व. रजनीकांत यांच्या नावावर अनेक विनोद, टोमणे, उपदेश, म्हणी, मिम्स प्रचलित आहेत. रजनीकांत यांचे देश विदेशात हजारो फॅन क्लब्ज आहेत. रजनीकांत यांना उद्देशून एखादा अपशब्द जरी काढला तरी तामिळनाडूत दंगली उसळतात. त्यांच्या इतकी लोकप्रियता कोणत्याच अभिनेत्याला मिळालेली नाही. त्यांचा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच सुपरहिट झालेला असतो. त्यांच्या चित्रपटाचे तिकीट काढण्यासाठी प्रेक्षक पहाटेपासूनच रांगा लावतात. त्यांच्या फोटोवर दुग्धाभिषेख करतात. तामिळनाडूत तर त्यांची मंदिरे आहेत. देवाप्रमाणे लोक त्यांची पूजा करतात. १२ डिसेंबर १९५० रोजी बंगळुरू येथे एका महाराष्ट्रीयन कुटुंबात रजनीकांत यांचा जन्म झाला. त्यांचे खरे नाव शिवाजीराव गायकवाड असून त्यांच्या वडिलांचे नाव रामोजीराव गायकवाड असे असून आईचे नाव जिजाबाई असे आहे. पुरंदर तालुक्यातील मावडी- कडेपठार हे त्यांचे मूळ गाव. ८० - ९० वर्षांपूर्वी त्यांचे कुटुंब बंगळुरात स्थलांतरित झाले व तिथेच स्थायिक झाले. त्यांचे वडील कर्नाटक पोलिसात शिपाई होते. रजनीकांत यांना लहानपणापासून अभिनयाचे वेड होते. अभिनयाचे वेड जपत त्यांनी अनेक लहानसहान कामे केली. बारावी पास झाल्यावर काही काळ त्यांनी बस कंडक्टर म्हणूनही काम केले. नशिब आजमावण्यासाठी त्यांनी मद्रास फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला आणि सिनेजगताला एक सुपरस्टार मिळाला. अपूर्ण रागंगल या तामिळ चित्रपटातुन त्यांनी आपल्या फिल्मी करियरची सुरवात केली. आजवर त्यांनी १५० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. अंधा कानून या चित्रपटातून त्यांनी बॉलिवूड मध्ये पदार्पण केले. केवळ तामिळ आणि हिंदीच नव्हे तर कन्नड, तेलगू, तामिळ, बंगाली, इंग्रजी चित्रपटातून भूमिका केल्या. चार दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे रजनीकांत हे आपल्या अभिनयाबरोबरच आपल्या डॅशिंग स्टाईल आणि स्टंट साठीही ओळखले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण त्यांचे चाहते आहेत. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट, प्रेक्षकांची गर्दी खेचून आणणारे, आपल्या संवाद फेकी बद्दल प्रसिद्ध आणि विशिष्ट स्टाईल बद्दल प्रसिद्ध आणि आपल्या विशिष्ट अभिनय शैली साठी रजनीकांत ओळखले जातात. दक्षिण भारतात त्यांच्या नावे सर्वात जास्त यशस्वी चित्रपट आहेत. त्यांचा चाहतावर्ग देशातच नाही तर विदेशातही आहे. जपानमध्ये त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. तिथे त्यांचे चित्रपट अधिक लोकप्रिय आहेत. तिथेही त्यांचे फॅन क्लब्ज आहेत. सर्वाधिक चाहतावर्ग असलेला अभिनेता म्हणून त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये त्यांची नोंद झाली आहे. त्यांना चार वेळा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला आहे. रजनीकांत जितके अभिनेते म्हणून श्रेष्ठ आहेत तितकेच ते माणूस म्हणूनही श्रेष्ठ आहेत. ते त्यांना मिळणाऱ्या मानधनाच्या एकूण ४० टक्के एव्हढी रक्कम समाजसेवेसाठी वापरतात. रजनीकांत हे असे एकमेव अभिनेते आहेत की जे एकाही उत्पादनाची जाहिरात करत नाहीत. उद्देश एकच की लोकांमध्ये कोणताही चुकीचा संदेश जाऊ नये. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या या सुपरस्टारला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# ११ ते १७ डिसेंबर दरम्यान सिकलसेल आजार जनजागृती सप्ताह

### नागरिकांनी सिकलसेलची रक्त तपासणी करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील आरोग्य संस्थामध्ये दि.११ ते १७ डिसेंबर दरम्यान सिकलसेल आजार जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहात जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्था स्तरावर सिकलसेल आजाराची तपासणी व मार्गदशन शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने जास्तीत जास्त लोकांनी जवळच्या आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय किंवा उपजिल्हा रुग्णालय येथे जाऊन आपली सिकलसेलची रक्त तपासणी करण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अमोल गीते यांनी केले आहे.

सिकलसेल आजार हा अनुवांशीक असून आई-वडिलांपासून अपत्यांना होतो. सिकलसेल हा रक्तपेशी संबंधित आजार आहे. सामान्य रक्तपेशी या वर्तुळाकार व लवचिक असतात तर सिकलसेल रक्तपेशी या विळ्याच्या आकारच्या व ताठर असतात. सशक्त आरबीसी रक्तवाहिन्यातून सरळ निघून जातात. परंतू सिकल रक्तपेशी रक्तवाहिन्याला चिकटून राहतात व लवकरच अडथळा निर्माण होऊन त्या भागातील रक्तपुरवठा खंडित होतो, त्याला सिकलसेल आजार म्हटले जाते. यामुळे असहय वेदना होतात अशी इजा वारंवार झाल्यामुळे अवयवाला जबरदस्त इजा होऊन तो अवयव निकामी होतो.

प्लीहामध्ये नष्ट झालेल्या रक्तपेशी जमा होतात, सिकल रक्तपेशी अडकवून प्लीहेवर जबरदस्त सुज येते व त्याची कार्यक्षमता कमी होते. आजाराविरुध्दची रोग प्रतिकारक क्षमता कमी होते. रोगप्रतिकारक क्षमता कमी झाल्यामुळे आजारांचे प्रमाण अधिक वाढते.

ज्या भागात रक्त पुरवठा खंडित होतो, त्या भागातील अवयवांना इजा होत असते. त्यामुळे सिकलसेल रुग्णांना हाडे, फुफुस्स यकृत, प्लीहा, मेंदु प्रामुख्याने बळी पडून आजारांची गंभीरता वाढून मृत्यू होऊ शकतो. हे सर्व नकळत होऊन आपल्याला उपचाराला सुध्दा वेळ मिळत नाही. याशिवाय डोळे स्वादुपिंड त्वचा, पित्ताशय सुद्धा प्रभावित होऊ शकतात. वाहक व रुग्ण हे सिकलसेल आजाराचे दोन प्रकार असून या आजाराला प्रतिबंध करायचा असेल तर वाहक-रुग्ण, वाहक-वाहक, रुग्ण-रुग्ण यांनी आपआपसात विवाह करुन नये. कारण, अपत्य हे सिकलसेल आजाराचे वाहक किंवा रुग्ण होण्याची शक्यता असते.

सिकलसेल हा अनुवांशीक आजार आहे. सिकलसेल आजाराचा संपूर्ण उपचार नाही, परंतू नियंत्रण शक्य आहे. सिकलसेल रुग्णांस नियमित आणि समतोल आहार आवश्यक आहे. योग्य औषधोपचाराने सिकलसेल रुग्णांचे आयुष्य वाढण्यास मदत होते.

जिल्ह्यात सन २०१० पासून एकूण १०,४०, ४१३ सिकलसेल तपासण्या झाल्या असून त्यामध्ये १,६९७ वाहक व २६३ सिकलसेलग्रस्त रुग्ण आढळून आले आहेत. सर्व रुग्णांना मोफत औषधोपचार व रक्त पुरवठा, समुपदेशन करण्यात येते. त्याचप्रामाणे सिकलसेल रुग्णांना संजय गांधी निराधार योजनेंतर्गत आर्थिक लाभ मिळतो. इयत्ता १० वी व १२ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षेच्या वेळी प्रत्येक तासाला २० मिनिटांचा अधिक अवधी दिला जातो. सिकलसेल रुग्णांना उपचारासाठी बस प्रवासात सवलत दिली जाते.

### सिकलसेल आजाराची लक्षणे

- रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे.
- हातापायावर सूज येणे.
- भूक मंदावणे.
- सांधे दुखणे, असह्य वेदना होणे.
- लवकर थकवा येणे.
- चेहरा निस्तेज दिसणे.

### सिकलसेल आजारावरील उपचार

- या आजारावर उपचार नाही पण आजाराच्या गंभीर त्रासावर नियंत्रण ठेवता येते. सिकलसेल रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून नियमित तपासणी व रक्त चाचणीची आवश्यकता असते.
- फॉलिक ॲसिडच्या गोळ्या नियमित घेणे.
- सोडामिंटच्या गोळ्यांचे सेवन महत्वाचे असते. भरपूर पाणी प्यावे. (दररोज ८ ते १० ग्लास)
- वेदनाशामक गोळ्या, नियमित तपासणी व सल्ला घेणे गरज भासल्यास रक्त संक्रमण करणे.
- समतोल आहार घ्यावा. सिकलसेल रुग्णांनी आहारात विविधता ठेवावी. दिवसातून तीन वेळा आहार घ्यावा. मासे, अंडी, संत्री, हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली कडधान्य, शेंगा, झिंक असलेले पदार्थ खावे.
- बोनमॅरो ट्रान्सप्लाटेशन करुन हा आजार पूर्णतः बरा होऊ शकतो.

### प्रतिबंधासाठी उपाययोजना

- सिकलसेल हा आजार अनुवांशीक असल्यामुळे माता-पित्याकडून अपत्यांना हा आजार होतो.
- विवाहापूर्वी सिकलसेल तपासणी करुनच विवाह करावा.
- लाल आणि पिवळे कार्ड असलेल्यांनी आपआपसात विवाह टाळावा.
- सिकलसेलग्रस्त व वाहक रुग्णांनी निरोगी व्यक्तीशी विवाह करावा.
- सिकलसेलग्रस्त मातांनी गर्भधारणेनंतर आठ आठवड्याच्या आत गर्भजल तपासणी करुन घ्यावी.

# सहा पुरस्कारांसह राष्ट्रीय पंचायत पुरस्कारात महाराष्ट्र व्दितीय स्थानी



### सर्वोत्तम ग्रामपंचायत आणि ग्राम ऊर्जा स्वराज्य विशेष पंचायत या श्रेणींमध्ये मान्याचीवाडी ग्रामपंचायत अव्वल
### बेळा ग्रामपंचायत- कार्बन न्यूट्रल श्रेणीत प्रथम
### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

नवी दिल्ली, ११ : महाराष्ट्राने राष्ट्रीय पंचायत पुरस्कार -२०२४ मध्ये सहा राष्ट्रीय पुरस्कार मिळवत दुसरा क्रमांक मिळवला. ओडिशा आणि त्रिपुरा राज्याने प्रत्येकी सात पुरस्कारांसह संयुक्तपणे पहिला क्रमांक पटकावला आहे. आंध्र प्रदेश चार पुरस्कारांसह तिसऱ्या स्थानावर तर बिहार आणि हिमाचल प्रदेश राज्यांनी प्रत्येकी तीन श्रेणींमध्ये पुरस्कार मिळवले.

दारिद्र्य निर्मूलन, आरोग्य, बालकल्याण, जलसंधारण, स्वच्छता, पायाभूत सुविधा, सामाजिक न्याय, प्रशासन आणि महिला सक्षमीकरण या निकषांवर पंचायतींच्या प्रयत्नांना ओळखण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय ग्रामीण विकास व पंचायती राज विभागाच्यावतीने राष्ट्रीय पंचायत पुरस्कार समारंभ आयोजित करण्यात आला.

विज्ञान भवनात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात, संयुक्त राष्ट्राने ठरविलेल्या विविध श्रेणीतील ४५ पुरस्कारांचे वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज करण्यात आले. या कार्यक्रमासाठी केंद्रीय पंचायती राज मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह, राज्यमंत्री प्रो. एस.पी बघेल, सचिव विवेक भारव्दाज यांसह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विविध श्रेणींमध्ये राष्ट्रीय पंचायत पुरस्कार प्रदान केला. यावेळी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन करताना, श्रीमती मुर्मू यांनी या पुरस्कारांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या मान्यतेचा उद्देश इतर पंचायतींना सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करण्यास व ग्रामीण भारताच्या सर्वांगीण विकासात योगदान देण्यासाठी प्रेरित करेल, अशी आशाही व्यक्त केली.

पंचायती राज राष्ट्रीय पुरस्कार विविध श्रेणींमध्ये प्रदान करण्यात आले यामध्ये दिनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत एकूण २७ पुरस्कार प्रदान करण्यात आले. या श्रेणीत नाशिक जिल्ह्यातील मोडाळे ग्रामपंचायतीला स्वच्छ व हरित पंचायत श्रेणीत तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार ग्रामपंचायतीच्या प्रतिनिधींनी स्वीकारला.

सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी या ग्रामपंचायतीला आज दोन श्रेणीत प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पहिली श्रेणी - नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत एकूण नऊ पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात सर्वोत्तम ग्रामपंचायतचा प्रथम पुरस्कार सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी ग्रामपंचायतीला प्रदान करण्यात आला तर याच ग्रामपंचायतीला ग्राम उर्जा स्वराज्य विशेष पुरस्कार श्रेणीत अव्वल स्थान प्राप्त झाला व प्रथम पुरस्काराने गौरविण्यात आले. या श्रेणीत नऊ पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार ग्रामपंचायतीच्या प्रतिनिधींनी स्वीकारला.

नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीतील सर्वोत्तम ब्लॉक पंचायत या श्रेणीत गोंदिया जिल्ह्यातील तिरोरा या पंचायत समितीला तृतीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार तिरोरा पंचायत समितीच्या प्रतिनिधींनी स्वीकारला. कार्बन न्यूट्रल विशेष पुरस्काराच्या श्रेणीत भंडारा जिल्ह्यातील बेळा ग्रामपंचायतीला प्रथम पुरस्कारने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार ग्रामपंचायतीच्या प्रतिनिधींनी स्वीकारला. तर, पंचायत क्षमतानिर्माण सर्वोत्तम संस्थान या श्रेणीत पुण्याच्या यशदा अकादमीला तृतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार अकादमीचे उप महासंचालक व संचालक मल्लिनाथ कलशेट्टी व वरिष्ठ अधिकारी यांनी स्वीकारला.

यावेळी केंद्रीय पंचायत राज मंत्री श्री राजीव रंजन सिंह यांनी विजेत्या पंचायतांना डिजिटल स्वरूपात पुरस्काराची रक्कम हस्तांतरित केली. मोडाळे ग्रामपंचातीला ५० लाख, मान्याचीवाडीला २.५ कोटी (रूपये १.५ कोटी व रूपये १.०० कोटी ग्राम ऊर्जा श्रेणीत), तिरोरा पंचायत समितीला १.५ कोटी, बेळा ग्रामपंचायतीला रूपये १ कोटी आणि यशदा अकादमीला ५० लाख रुपये प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमात पंचायत राजमंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह यांनी 'पुरस्कार प्राप्त पंचायतांचे कार्य: सर्वोत्तम प्रथा' या पुस्तिकेचे अनावरण केले. या पुस्तिकेची पहिली प्रत राष्ट्रपतींना सादर करण्यात आली. याशिवाय, काही पंचायतांच्या उत्कृष्ट कार्यावर आधारित एक माहितीपट देखील सादर करण्यात आला.

राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४ मध्ये विविध श्रेणींमध्ये पंचायतींना सन्मानित करण्यात आले, त्यात दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार, नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार, ग्राम ऊर्जा स्वराज विशेष पंचायत पुरस्कार, कार्बन न्यूट्रल विशेष पंचायत पुरस्कार आणि पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्थान पुरस्कार श्रेणींचा समावेश होता.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

महत्त्वाचे...

## संतोष देशमुख हत्या प्रकरणात आणखी एकाला अटक




दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील महिला सरपंचाच्या पतीच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी आणखी एका आरोपीला पुण्याहून अटक केली आहे. प्रतीक घुले असं ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून उर्वरित फरार आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची दोन पथके रवाना झाली आहेत.

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली. या प्रकरणात केज पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील एकूण तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. आज सकाळी या प्रकरणातील आणखी एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तर नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये असे आवाहन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी केले आहे.

## पशुसंवर्धन विभागामार्फत माळेगाव यात्रेनिमित्त पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : माळेगाव यात्रेनिमित्त नांदेड जिल्ह्यासह लातूर, परभणी या जिल्ह्यातून विविध पशुसंवर्धन करणारे हे आपले हजेरी लावतात. दिनांक ३० डिसेंबर रोजी या पशुसंवर्धन विभागामार्फत पशुसंवर्धन प्रदर्शनासह स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. निवडून येणाऱ्या स्पर्धकाला जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे व सर्व अर्थात घोडे, उंट, बैल, गाढव, मेंढ्या, बकऱ्या, कोंबडे तसेच पशु यात्रेमध्ये सहभागी होतात त्यांना कुठलीच दुखापत होऊ नये यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे तसेच पशुसंवर्धन आरोग्य विभाग यांच्या वतीने विविध पदके देखील तयार करण्यात आली आहेत. कुठल्या जनावराला काही रोग आढळल्यास त्याच ठिकाणी त्यांचे उपचार देखील करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषद पशुसंवर्धन अधिकारी यांनी दिली आहे.

## क्षयरोग चिकित्सेसाठी भिवंडी पालिकेस एक्सरे मशीन सुपुर्द



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी** : २०२५ पर्यंत भारत क्षयरोग मुक्त करण्याचे लक्ष्य असून त्या प्रमाणे संशयित क्षयरोग लागण झालेल्या रुग्णांना लवकरात लवकर ओळखून त्यांना औषधोपचार होणे महत्वाचे असल्याने राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत विविध योजना शासनाकडून राबविण्यात येत आहेत. त्यातले सर्वात सोपे,जलद व कमी खर्चिक तपासणी म्हणजे Chest X-ray screening आहे. एकूण लोकसंखेच्या ३ टक्के संशयित क्षयरुग्ण तपासणी होण्याचे लक्ष्य आहे, भिवंडी या यंत्रमाग उद्योग नगरीत क्षयरुग्णांचे वाढते प्रमाण व क्षयरोग रुग्ण संख्या पाहता मोठ्या प्रमाणात तपासणी अपुऱ्या अनुदाना मधून होणे शक्य नाही, सदर बाब गुरुकृपा विकास संस्था या स्वयंसेवी संस्थेचे संचालक विशाल प्रदीप बोडके यांनी समजून काही नामांकित कंपनी कडे संपर्कात साधून कोलिशन ४ टीबी एलिमिनेशन फाउंडेशन कंपनीच्या सी एस आर फंडातून ३० लाख ५० हजार रुपये किंमतीचे अत्याधुनिक एक्स रे स्क्रिनिंग यंत्र भिवंडी महानगरपालिकेस मिळाले आहे. त्यानुसार भिवंडी शहराची लोकसंख्या अंदाजे १५ लाख आहे त्यानुसार ४५ हजार नागरिकांची स्क्रिनिंग होण्याचे लक्ष्य असून सध्या वर्षाला सरासरी फक्त ८ ते ९ हजार संशयित क्षयरोग रुग्णांची तपासणी होत आहे.

## छाया कदम यांच्या 'ऑल वुई इमॅजिन ॲज लाइट' ला ८२ व्या वार्षिक गोल्डन ग्लोब अवॉर्ड्‌समध्ये

**मुंबई/प्रतिनिधी** : छाया कदम यांनी २०२४ वर्षात विविध भूमिका साकारल्या आणि त्या जागतिक स्तरावर जाऊन पोहचल्या ! नुकताच त्यांचा 'ऑल वुई इमॅजिन ॲज लाइट' ला ८२व्या वार्षिक गोल्डन ग्लोब अवॉर्ड्‌समध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (मोशन पिक्चर) श्रेणीमध्ये नामांकन मिळालं आहे आणि महत्त्वाची बाब अशी 'ऑल वुई इमॅजिन ॲज लाइट' एकूण दोन नामांकने मिळाली असून दुसरी एक सर्वोत्कृष्ट मोशन पिक्चर (इंग्रजी नसलेली भाषा) साठी आहे. विशेष म्हणजे या श्रेणीमध्ये भारतीय दिग्दर्शकाचे नाम ांकन होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

# समाज कंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून फाशीची शिक्षा

दैनिक आपला विदर्भ

**ढाकनी/प्रतिनिधी** : परभणी येथे भारतीय संविधानाच्या प्रतिची विटंबना करणाऱ्या समाज कंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून फाशीची शिक्षा घ्यावी अशी मागणी बिटरगांव बु.ठाणेदारामार्फत गृहमंत्री यांना निवेदना द्वारे ११ डिसेंबर रोजी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी परभणी येथे पुरोगामी महाराष्ट्राला काळिमा फासनारी घटना घडली. एका जातीय विकृत मानसिकतेच्या व्यक्तीने परभणी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीला दगडाने ठेचुन नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ही अतिशय संत्ताय जनक

**बिटरगांव बु.ठाणेदारामार्फत गृहमंत्री यांना निवेदन**



बाब असुन महाराष्ट्रातील समस्त भारतातील संविधान प्रेमी व आंबेडकर अनुयांगांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. या घटने मागील मास्टर मांईड शोधुन आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनावर माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव लक्ष्मण गायकवाड, आझाद समाज पार्टी जिल्हाध्यक्ष प्रशांत उर्फ बॉन्टी विनकरे, ढाकणी नगर परिषद सभापती संबोधी गायकवाड,नगरसेवक प्रतिनीधी सुभाष गायकवाड, भा.मु.मोर्चा तालुका प्रमुख प्रकाश कांबळे, भीम टायगर सेना जिल्हा उपाध्यक्ष करण के भरणे, ढाणकी अनु. जाती शहर अध्यक्ष अक्षय भगत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नाशिकमध्ये युववासेनेचे राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात आंदोलन

### नियमबाह्य वाईन शॉप बंद करण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक /प्रतिनिधी** : नाशिक येथील सातपूर मंदिर परिसरातील सुरू असलेला वाईन बार बंद करावा, या मागणीसाठी युवा सेनेच्या वतीने राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात धडक देऊन अधिकाऱ्याला पाकिस्तान आणि बांगलादेश चा झेंडा देऊन आंदोलन केले. नाशिक येथील सातपूर परिसरात असलेल्या एका हनुमान मंदिराच्या काही अंतरावर असलेल्या वाईन शॉप बंद करण्याची केली होती. राज्य उत्पादन शुल्क विभागाने वाईन शॉप बंद करण्याऐवजी मंदिर बाबत चौकशी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा युवासेनेने आरोप केला.

नियमानुसार मंदिरापासून ७५ मीटर च्या आत वाईन शॉप असल्यास परवाना होऊ शकतो, असे असताना राज्य उत्पादन शुल्क विभागाने वाईन शॉप परवाना रद्द न करता मंदिराची चौकशी करण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार युवा सेनेच्या लक्षात येताच त्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागा विरोधात आक्रमक पवित्रा घेत अधिकाऱ्यांना पाकिस्तान आणि बांगलादेशचा झेंडा देत आंदोलन केले.

तर नाशिक विभागाचे उत्पादन शुल्क अधीक्षक शशिकांत गर्जे यांनी सदर वाईन शॉप बंद करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना अवहाल सादर करणार करणार असल्याची माहिती यावेळी दिली. येथील वाईन शॉप बंद करण्याची मागणी या आधी साधू महंतांनी देखील केली होती. तर वाईन शॉप मालकांनी आमच्याकडे सर्व कागदपत्रे असल्याचे खुलासा केला. यावेळी युवा सेना पदाधिकारी योगेश बेलदार यांनी याबाबत योग्य निर्णय न घेतल्यास पुढेही असा तमाशा करू असा इशारा राज्य उत्पादन शुल्क विभागाला दिला आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली राष्ट्रपती, उपराष्ट्रपतींची सदिच्छा भेट





नवी दिल्ली, ११ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्ली येथे राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची सदिच्छा भेट घेतली.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांचा हा पहिलाच दिल्ली दौरा आहे. आज दिल्लीत आगमन झाल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रपती भवनात जाऊन राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांची भेट घेतली. महाराष्ट्राचे दैवत असलेल्या विठ्ठल-रुख्मिणीची मूर्ती देऊन त्यांचा आदर-सत्कार केला आणि त्यांचे आशीर्वाद घेतले.

त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या निवासस्थानी गेले. तेथे त्यांना विठ्ठल-रुख्मिणीची मूर्ती देऊन उपराष्ट्रपती महोदयांचा सत्कार केला आणि त्यांचे आशीर्वाद घेतले.

## शेतकऱ्यांसाठी असलेल्या सर्व योजनेची माहिती ग्रामस्तरावर उपलब्ध करुन द्यावी : ॲड. निलेश हेलोंडे-पाटील

दैनिक आपला विदर्भ

**हिंगोली /प्रतिनिधी** : शासनामार्फत शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची माहिती प्रत्येक गावातील ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे-पाटील यांनी आढावा बैठकीत दिले.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची आढावा बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी प्र.जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी ॲड. हेलोंडे-पाटील म्हणाले, मराठवाड्यात मागच्या वर्षी चाऱ्यांची कमतरता होती. त्यामुळे जिल्ह्यात पाण्याची उपलब्धता पाहून गायरान जमिनीवर जास्तीत जास्त चारा लागवड करुन तो शेतकऱ्यांना उपलब्ध करुन द्यावा. यामुळे जिल्ह्यातील उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांची प्रगती होण्यास मदत होणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या जमिनी सावकाराकडे गहाण असल्यास त्या सोडवून द्याव्यात. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हमीभावाचे दरफलक दर्शनी भागात लावावेत. शेतमाल तारण योजनेची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रचार, प्रसिध्दी करावी. वन्य प्राण्यांच्या नुकसानीचा मोबदला देण्यासाठी शिबिरे घेऊन जनजागृती करावी. यासाठी ऑनलाईन भरण्यात येणाऱ्या अर्जासाठी गावातील आपले सरकार सेवा केंद्रावर सहकार्य करावे. तसेच प्रेरणा प्रकल्पांतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे तसेच आत्महत्या होऊ नये यासाठीही समुपदेशन करावेत. त्यांच्यावर मोफत उपचार करावेत. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबासाठी अन्नसुरक्षा योजनेचा लाभ मिळत असल्याची खात्री करावी.

तसेच कौशल्य विकास विभागाच्या योजना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलापर्यंत पोहोचविण्यासाठी योजनेची माहिती ग्रामस्तरावर उपलब्ध करुन द्यावी. प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत मैदान विकसित झाले पाहिजेत. शाळेमध्ये आरोग्य शिबिरे आयोजित करावीत. आदिवासी विकास विभागाच्या योजना, एमआयडीसीच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा. शेतकऱ्यांच्या बांधावर जैविक प्रयोगशाळेची उभारणी करुन शेतीसाठी लागणारी जैविक खते, वस्तू घरच्या घरी तयार करण्याबाबत शेतक-यांना मार्गदर्शन करावे. आकाशातून पडणाऱ्या विजांपासून वाचण्यासाठी दामिनी पच्या वापराची माहिती, हवामान विषयक उपक्रमाची माहिती सर्वसामान्यापर्यंत पोहोचवावी. प्रधानमंत्री पीकविमा योजनेच्या प्रतिनिधीची मोबाईल क्रमांकासह यादी ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागात लावावी. यासह शासनाच्या इतर सर्व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामस्तरावर शिबिरे घेऊन जनजागृती करावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

याप्रसंगी प्र.जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्याची संक्षिप्त माहिती दिली. तसेच सर्व संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनीही राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

बैठकीस उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोल, विभागीय वन अधिकारी डॉ. आर. पी. नाळे, पशुसंवर्धन उपायुक्त सखाराम खुणे, जिल्हा उपनिबंधक एस. एल. बोराडे, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त डॉ. राजपाल कोल्हे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# इतर मागासवर्गीय महामंडळाच्या विविध कर्ज योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांच्या उपकंपनी जगदज्योती महात्मा बसवेश्र्वर आर्थिक विकास महामंडळ, संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ व संतसेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ या तिन्ही महामंडळामार्फत इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण कल्याणाकरिता बेरोजगारांसाठी, स्वयंम उद्योगासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. इतर मागासवर्गीय प्रवर्गातील गरजु व कुशल व्यावसायिक व्यक्तींना कृषी सलग्न व पारंपारीक उपक्रम व लघु उद्योग व मध्यम उद्योग उत्पादन, व्यापार विक्री सेवाक्षेत्र इत्यादी व्यवसाय करीता या महामंडळाच्या नांदेड जिल्ह्याकरीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मुख्यालय स्तरावरून उद्दीष्ट प्राप्त झाले आहे.

या योजनेत अर्जदाराचा सिबिल क्रेडिट स्कोअर किमान ५०० पेक्षा जास्त असावा. अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रुपये एक लाखापेक्षा कमी असावे. परतफेडीचा कालावधी ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये राहिल. नियमीत परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना या योजनेत व्याज अदा करावे लागणार नाही परंतू थकित झालेल्या हप्त्यांवर द.सा.द.शे. ४ टक्के व्याजदर आकारण्यात येईल.

या योजनेमध्ये ७५ टक्के रक्कम ही बँकेची असून त्यावरील व्याज हे बँकेच्या नियमाप्रमाणे राहील. २० टक्के रक्कम ही महामंडळाची असून त्यावर द.सा.द.शे. ६ टक्के व्याज आकारण्यात येते व ५ टक्के सहभाग हा लाभार्थ्यांचा आहे. या योजनेची कर्ज मर्यादा रुपये ५ लाखापर्यंत असून परतफेडीचा कालावधी पाच वर्षाचा समान ६० हप्त्याचा आहे.

ही योजना बँकेमार्फत राबविण्यात येत असून कर्ज मर्यादा १० लाख रुपयापर्यंतची आहे. या योजनेत महामंडळाच्या वेबपोर्टल संगणक प्रणालीवर नावनोंदणी करणे अनिवार्य आहे. या योजनेत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाखापर्यंत आहे. कर्ज परतफेडीचा कालावधी बँकेच्या निकषाप्रमाणे तसेच कर्ज रक्कमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादित) व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरूपात बँक प्रमाणिकरणानुसार लाभार्थ्याच्या आधारलिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. तसेच लाभार्थ्यांने ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरू असल्याचे किमान दोन छायाचित्रे अपलोड करणे अनिवार्य आहे.




सदर योजना बँकेमार्फत राबविण्यात येत असून कर्ज मर्यादा १० ते ५० लाख रुपयापर्यंतची आहे. या योजनेत महामंडळाच्या वेबपोर्टल संगणक प्रणालीवर नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे. गटातील लाभार्थ्यांचे वय १८ ते ४५ वर्षे असावे. गटातील लाभार्थ्यांनी यापूर्वी महामंडळाचा किंवा इतर कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा. इतर मागास प्रवर्गातील महामंडळाच्या निकषांनुसार विहित केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्या देतील. उमेदवाराचे बचतगट, भागीदार संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत) एलएलपी, एफपीओ अशा शासन प्रमाणीकरण प्राप्त संस्थांना बँकेतर्फे स्वयंरोजगार उद्योग उभारणीकरीता जे कर्ज दिले जाईल त्या कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा हा बँक प्रमाणिकरणानुसार महामंडळाकडून अदा केला जाईल.

ही योजना बँकेमार्फत राबविण्यात येत असून कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा देशांतर्गत व परदेशी उच्च शिक्षणासाठी कर्ज मर्यादा १० ते २० लक्ष रुपयापर्यतची आहे. या योजनेत महामंडळाच्या वेबपोर्टल संगणक प्रणालीवर नाव नोंदणी अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांचे वय १७ ते ३० वर्षे असावे. अर्जदाराची कुटुंबिक वार्षीक उत्पन्न मर्यादा ८ लक्ष रुपये असावे. विद्यार्थी बारावीत ६० टक्के गुणासह उत्तीर्ण असावा. रक्कमेवरील व्याज परतावा हा बँक प्रमाणिकरणानुसार महामंडळाकडून अदा केले जाईल.

ही योजना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लोकसंचालीत साधन केंद्र (CMRC) मार्फत राबविल्या जात आहे. इतर मागास प्रवर्गातील किमान ५० टक्के महिलांचा समावेश असलेल्या पात्र महिला बचत गटास प्रथम टप्यात ५ लाख रुपया पर्यंत कर्ज बँकेमार्फत उपलद्ध करून घेण्यास मान्यता देण्यात येईल. कर्ज परतफेडीचा कालावधी बँकेच्या निकषाप्रमाणे तसेच कर्ज रक्कमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादित) व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरूपात बँक प्रमाणिकरणानुसार लाभार्थ्यांच्या आधारलिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल.

या विविध कर्ज योजना बँकेमार्फत असून लाभार्थ्यांनी महामंडळाच्या संकेतस्थळावर www.msobcfdc.org ऑनलाईन अर्ज भरावा. योजनेच्या अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. जिल्हा कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ग्यानमाता शाळेसमोर नांदेड-४३१६०५ दूरध्वनी क्र. ०२४६२-२२०८६५ अथवा www.msobcfdc.org या वेबसाइट संपर्क साधावा. या योजनेचा लाभ इतर मागासवर्गीय समाजातील व्यक्तिने जास्तीत जास्त प्रमाणात घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# आमदार सिद्धार्थ खरात जिजाऊ चरणी नतमस्तक, आमदारकीचे ओळखपत्र बॅच जिजाऊ चरणी अर्पण

## मा जिजाऊ नगरीत आ सिद्धार्थ खरात यांचे जल्लोषात स्वागत

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/विशेष प्रतिनिधी** : शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात शोषित वंचित यांना एकत्रित करून एक नवा आदर्श उभा करण्याचा त्याचबरोबर मातु तीर्थ असलेल्या सिंदखेडराजा चा विकास करण्याचा माझा मानस आहे. तो मी पूर्ण करीन राजमाता जिजाऊ माझ्या प्रेरणास्थान आहेत. असे प्रतिपादन आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले. ते आमदार झाल्यानंतर व शपथविधीनंतर मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे येऊन राजमाता जिजाऊ चरणी नतमस्तक झाल्यानंतर माध्यमांशी बोलत होते. यावेळी आ. सिध्दार्थ खरात जिजाऊ चरणी नतमस्तक होत त्यांनी आमदारकीचे ओळखपत्र, बिल्ला जिजाऊ चरणी अर्पण केला.

यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले की, शिव,शाहू, फुले, आंबेडकर वंचित यांना एकत्रित मी एक व्यापक स्वरूप देण्याचे काम केले आहे. पुढे ही हे काम सुरूच राहील, राजमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थळी सतरा वर्षापासून शिव खिचडी वाटप करतो. हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज,महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत ज्ञानेश्वर यास इतर संतांचा आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर





यांनी लोकशाहीच्या माध्यमातून समाज प्रगती केली आहे. तर संतांनी धार्मिक चळवळीतून एक नवे ग्रुप या महाराष्ट्राला दिले आहे.

मात्र आता राजकारण मोठे लयाला गेले आहे .नैतिक अदपदनाच्या पायऱ्या तोडण्यात येत आहेत. सत्ता मिळवणे आणि सत्तेतून पैसा कमावणे हे हे धोरण आता राजकारणाचे झाले आहे. शिव,शाहू आंबेडकर चळवळीचा मी मानस जिजाऊ चरणी नतमस्तक होऊन व्यक्त केला असून या ठिकाणी एक नवे रूप घेईल. आमदारकीचेही कर्तव्य पार पाडेल व सत्ता कोणाचेही असो मी त्यामध्ये विकास कामाचे संधी शोधणार आहे. निवडणूक प्रचार काळात मी ज्या कमेंटमेंट केल्या त्या पूर्ण करेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

तर सिंदखेडराजा ही माझी जन्मभूमी असल्याने माझे मन या ठिकाणीच रमले होते. मी सिंदखेड राजा येथून निवडणूक लढविण्याचे ठरविले होते. परंतु डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी मला राजकारणाची संधी दिली. त्यामुळे मी त्यांच्याविरोधात उभा कसा राहू असा प्रश्न माझ्यामध्ये निर्माण झाला. ज्यांनी मला राजकारण शिकवले त्यांच्या विरोधात उभे राहणे शक्य नाही असे माझ्या मनाला वाटले, त्यामुळे मी उभा राहू शकलो नाही.महाभारतात अर्जुनांना युद्ध सुरू होण्यापूर्वी बाण चालवण्याचे सांगितले पण अर्जुनाचे धैर्य होय नव्हते कारण पुढे द्रोणाचार्य भीष्माचार्य दिसत होते. या कल्पनेने गर्भगळीत झालो.त्यामुळे मी निवडणूक या ठिकाणी लढवली नाही, या ठिकाणचे नवनिर्वाचित आमदार मनोज कायंदे सुद्धा चळवळीतले आहेत. त्यांचे मी अभिनंदन केले.

मी चळवळीला या ठिकाणाहून सुरुवात केली. ही माझी मातृभूमी आहे. मी दुधाची चळवळ, उत्कर्ष चळवळ, खिचडी वाटप आदी चळवळी या ठिकाणाहून सुरुवात केली आहे. गावागावात सहा वाजता मुंबई येथून येऊन दूध मोजले असेही मत त्यांनी यावेळी केले. सिंदखेड राजा हे माझे गाव आहे. मी कॉलेजमध्ये असताना या ठिकाणी अंतुले साहेब आले होते. त्यावेळी मी राजमाता जिजाऊ यांचे गाणे म्हणले होते. या गाण्याने मला एक नवी प्रेरणा दिली आणि त्या ठिकाणाहून मी खऱ्या अर्थाने जीवनातील यशस्वी पायऱ्या चढत गेलो असे मतही यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले. सिंदखेड राजाचा विकास मी आणि नवनिर्वाचित आमदार मनोज कायंदे आम्ही दोघे मिळून करणार आहोत. असा हा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## विविध वृत्त...

### संविधानाची अवहेलना करणाऱ्यावर सरकारकडून उचित कारवाईची अपेक्षा : विजय वडेट्टीवार



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : मराठवाड्यातील परभणी येथे भारतीय लोकशाहीचा सर्वोच्च ग्रंथ, असा पवित्र ग्रंथ संविधानाची विटंबना झाली.जाळपोळ करण्यात आली आहे. शासनाने कारवाई केली असती तर आज उद्रेकाच्या परिस्थितीला सामोरे जावे लागले नसते. आता संवेदनाची अवलना करणाऱ्यांवर सरकारकडून उचित कारवाई व्हावी अशी अपेक्षा आ.विजय वडेट्टीवर यांनी व्यक्त केली. ते माध्यमांशी बोलत होते.

पुढे बोलताना म्हणाले की, संविधानाचे पावित्र जपणे हे सरकारचे काम आहे, सरकारकडून उचित कारवाईची अपेक्षा आहे.मी सरकारला आवाहन करतो आहे की त्वरीत या संविधानाची अवहेलना करणाऱ्यावर कारवाई करावी तसेच मी संविधान प्रेमी जनतेला आवाहन करतो की शांतता आणि संयम बाळगावा, सरकारने त्वरीत पावले उतलावीत आणि कारवाई करावी, अशी अपेक्षा आ. विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केली.

### शालेय विद्यार्थ्यांसाठी उमरखेड - ढाणकी -हिमायतनगर बससेवा सुरु करा

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर माध्यमिक विद्यालय गांजेगाव,मुख्याध्यापक वाय. डी. वाघमारे यांची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी** : एसटी महामंडळाच्या बसेसमुळे ग्रामीण भागातील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध सवलतीचे पास दिले जातात. आता तर एसटी महामंडळ त्यांच्या शाळा - महाविद्यालयांनी दिलेल्या यादीनुसार संबंधित विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देणार आहे. जेणेकरून त्यांचा वेळ वाया जाणार नाही. पण उमरखेड आणि हिमायतनगर विद्यार्थ्यांना मात्र या योजनेच्या लाभा पासून वंचित रहावे लागत आहे. महाराष्ट्र समृद्धी मार्गाने विकसित झाला म्हणून रस्ते मंत्री सांगतात पण ढाणकी ते हिमायतनगर रस्ता पाहिला तर हे सगळे खोटे वाटते. कारण खराब रस्त्यामुळे उमरखेड वरून ढाणकी मार्ग हिमायतनगर बस बंद केल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना महागाई च्या काळात शिक्षण खर्च झेपवणारा नसताना त्यांना जास्त पैसे देऊन खाजगी वाहनातून प्रवास करत असताना पालकांना मानसिक बरोबर आर्थिकचा पण फटका बसत आहे. विद्यार्थ्यांचा त्रास बघता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर माध्यमिक विद्यालय मुख्याध्यापक वाय. डी. वाघमारे यांनी उमरखेड आगार प्रमुख यांना निवेदन देत,दरवर्षीप्रमाणे दिवाळीनंतर उमरखेड वरून ढाणकी मार्ग हिमायतनगर बस सेवा सुरू केली तर शाळेत येणारे डोल्हारी ते गांजेगाव या दरम्यान विद्यार्थ्यांना फायदा होईले तरी आपण आपल्या स्तरावरून विद्यार्थीच्या हिताच्या दृष्टीने विचार करून सदरील बससेवा सुरू करण्याची विनंती केली आहे.

### किशोरी शहाणेंचा वरुण धवनच्या गाण्यावर एनर्जेटिक डान्स, नेटकरी करतायत कौतुक

**मुंबई/प्रतिनिधी** : ९०च्या दशकात मराठी सिनेसृष्टीत आपल्या सहजसुंदर अभिनयाने आणि जबरदस्त नृत्य कौशल्याने प्रेक्षकांची मनं जिंकणाऱ्या किशोरी शहाणे सोशल मीडियावर खूप सक्रिय असतात. नेहमी सुंदर फोटो, डान्स व्हिडीओ शेअर करत असतात. तसंच सोशल मीडियावर ट्रेंड देखील फॉलो करताना दिसतात. नुकताच किशोरी शहाणे यांनी एक एनर्जेटिक डान्स व्हिडीओ शेअर केला आहे. हा डान्स व्हिडीओ पाहून नेटकरी त्यांचं भरभरून कौतुक करत आहेत.'बिग बॉस मराठी'च्या दुसऱ्या पर्वात झळकल्यानंतर किशोरी शहाणे हिंदी मालिकांमध्ये पाहायला मिळत आहेत. सध्या किशोरी शहाणे 'झी टीव्ही'वरील 'कैसे मुझे तुम मिल गए' या हिंदी मालिकेत काम करत आहेत. या मालिकेत त्यांनी बबिता आहुजा हे पात्र साकारलं आहे. काही दिवसांपूर्वी किशोरी शहाणे लेकाबरोबर आशिष शेलार यांनी आयोजित केलेल्या पार्टीमध्ये पाहायला मिळाल्या होत्या. याचे फोटो व्हायरले झाले होते.किशोरी शहाणेंच्या डान्स व्हिडीओवर इतर कलाकार मंडळींसह चाहत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत.

किशोरीताई एकच नंबर, मॅम, तुमची एनर्जी जबरदस्त आहे, खूप छान, वा ताई, क्या बात है, तुमच्या एनर्जीने माझा दिवस बनवला, लय भारी ताई, अशा नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी किशोरी शहाणे यांनी महाराष्ट्र भूषण अशोक सराफ यांची भेट घेतली होती. त्यांच्या हिंदी मालिकेच्या सेटच्या बाजूला अशोक सराफ चित्रीकरण करत असल्याचं समजात किशोरी शहाणे यांनी लगेच जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांच्याबरोबर हेमांगी कवी देखील होती. या भेटीचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

# सामाजिक व शैक्षणिक प्रगतीसाठी समाजाच्या प्रत्येक घटकाचा सहभाग आवश्यक : प्रा.रमेशआप्पा आवटे

## बुलढाणा जिल्हा कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा थाटात संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : सामाजिक व शैक्षणिक प्रगतीसाठी प्रत्येक घटकाचा सहभाग हा महत्त्वाचा आहे,असे मत प्रदेश अध्यक्ष प्रा. रमेशआप्पा आवटे यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा पुणे अंतर्गत बुलढाणा जिल्हा कार्यकारिणी सदस्य यांचा श्री पलसिध्द महास्वामी मठ संस्थान येथे आयोजित पदग्रहण सोहळ्यात दि.८ डिसेंबर रोजी येथे व्यक्त केले.

बुलढाणा जिल्हा समिती कार्यकारिणी पदग्रहण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रा. रमेशआप्पा आवटे हे होते.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी प्रदेशाध्यक्ष विश्वनाथ आप्पा हजारे, सरचिटणीस बाळासाहेब होनराव, उपाध्यक्ष महेश आप्पा शेटे, सहसचिव अँड बी.आर. सोनटक्के, डॉ. संगीता धाडकर, प्रदेश सदस्य अनिल आप्पा आवटी, सुभाष पाटील, मनिषा बोन्द्रे, सुनील आप्पा माटे, विजय आप्पा नांदेकर व जिल्हाध्यक्ष सुरेश आप्पा फिसके यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ नरेंद्र फिसके यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम दिपप्रज्वलन, जगद्गुरू पलसिध्द महास्वामी,संत बसवेश्र्वर महाराज,संत मनमत महाराज, लक्ष्मण महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला.,मान्यवरांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागता नंतर प्रास्ताविक मनोगतातून पत्रकार विशाल फितवे यांनी कार्यक्रम आयोजन भुमिका व जिल्हा कार्यकारिणी चे वार्षिक कार्याची विस्तृत माहिती यावेळी दिली.

याप्रसंगी वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंतांचा व जेष्ठ मंडळीचा सत्कार करण्यात आला, मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा कार्यकारिणी चा पदग्रहण सोहळा संपन्न होवून नियुक्ती पत्र देवून जवाबदारी टाकण्यात आली, पदग्रहण सोहळ्याचे अध्यक्ष प्रा रमेशआप्पा आवटे सह प्रा. हजारे, मनीषा बोन्द्रे, भारती शेटे, प्रिती बोंद्रे, नुतन दुकानदार,महेश आप्पा शेटे यांनी बहुमोल मार्गदर्शन करुन समाजा मध्ये एकोपा ठेवुन समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न करा असे आवाहन केले.

या पदग्रहण सोहळ्याला वाशीम,अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते, यशस्वीतेसाठी वीरशैव लिंगायत समाजाचे कृष्णाआप्पा साखळकर, ज्योती बुरखंडे, बबन आप्पा साखळीकर, गजानन चनेवार, विजय जोडेवार,डिगांबर आप्पा बुरखंडे,प्रतिक मिटकरी,अशोक माटे,प्रा अविनाश कापसे,प्रा. संतोष लामधाडे, संतोष बोचरे,संजय बुरंगे,शिवा कोमटे, भास्कर शेलगेनवार, किशोर अजबे,अशोक निंचग,राजेश नंदकुळे, प्रशांत बुरखंडे,संजय अजबे सह समस्त समाज बांधवांनी अथक परिश्रम घेतले.

# परभणी घटनेच्या निषेधार्थ ठाणेदार यांना निवेदन

दोषीवर कारवाई करण्याची डोणगाव येथील आंबेडकरी अनुयायांची मागणी





दैनिक आपला विदर्भ


**डोणगाव/प्रतिनिधी** : परभणी येथे संविधान पुस्तकाच्या प्रतिकृतीची तोडफोड करून विटंबना करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करून डोणगाव येथील आंबेडकरी अनुयायांनी डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना दि.११ डिसेंबर रोजी निवेदनाद्वारे करून या घटनेचा जाहीर निषेध केला.

डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना दिलेल्या निवेदनाद्वात नमूद केले आहे की परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोरील संविधान पुस्तकाच्या प्रतिकृतीची तोडफोड करण्यात आली. त्यामुळे समस्थ समाज बांधवांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. तरी जातीयवादी मानसिकतेतून हे कृत्य करण्याऱ्या नराधमास कठोर शासन करून त्यावर कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा समाज बांधवाच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल. अश्या घटना पुन्हा घडू नये व जातीय सलोखा अबाधीत राहावा त्यासाठी प्रशासनाने असे पुन्हा घडू नये याची काळजी घ्यावी, अशी मागणी समस्थ आंबेडकरी अनयायांनी डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# वारकरी चळवळीने महाराष्ट्राला सावरण्याचे काम केले : आ. सिद्धार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ

**सिंदखेडराजा/प्रतिनिधी** : महाराष्ट्राला वारकरी चळवळीचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. वारकरी संप्रदायाने त्यावेळी भरकटलेल्या महाराष्ट्राला सावरण्याचे काम केले आहे आणि संत तुकाराम आणि या वारकरी संप्रदायाचा कळस असून त्यांनी शास्त्रशुद्ध मांडणी केली आहे. महाराष्ट्र राज्यात वारकरी चळवळ महाराष्ट्र ही एक वेगळी ओळख आहे.महाराष्ट्राला इ.स.१२०० पासून संतांचे योगदान लाभलेले आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे असे प्रतिपादन आमदार सिद्धार्थ खरात यांनी





केले.विधान भवनातून शपथ घेतल्यानंतर त्यांनी त्यांना मिळालेले ओळखपत्र व बिल्ला मातृभूमी सिनखेडराजा येथील जिजाऊ चरणी अर्पण केले व अभिवादन करत आपल्या राजकीय सुरुवात केली. माध्यमांशी बोलताना सांगितले. विधानसभा शपथविधी नंतर आ.सिद्धार्थ खरात यांनी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे जाऊन जिजाऊंना अभिवादन केले.त्याचबरोबर इतर महापुरुषांना अभिवादन केले. त्यानंतर त्यांना तालुक्यातील वैष्णवी गड येथे जाऊन वारकऱ्यांसोबत वारकऱ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून माहिती, मार्गदर्शन मिळवले. यावेळी माध्यमाची बोलताना त्यांनी वारकरी चळवळीशी कसा जळलो हे सांगताना मी डॉ. सदानंद मोरे यांचा संत तुकाराम दर्शन हा ग्रंथ चाळला आणि वारकरी चळवळीशी सहज जुळलो असल्याचे सांगत वारकरी चळवळ ही महाराष्ट्राला मिळालेला समृद्ध वारसा आहे वारकरी चळवळीने त्यावेळेस भरकटलेल्या महाराष्ट्राला सावरण्याचे काम केले. विविध संत हे वारकरी चळवळीतील प्रमुख होते.तर संत तुकाराम हे वारकरी चळवळीचे कळस होते. संत तुकाराम दर्शन या ग्रंथांनी मला चळवळीकडे आणले असल्याचे सांगितले. शिव,शाहू, फुले, आंबेडकर या चळवळीने न्याय हक्क अधिकार यासाठी लढा दिला आहे. तर वारकरी चळवळीने नैतिकता कायम ठेवण्यासाठी खूप मोठे योगदान दिले आहे. वारकरी चळवळ ही खूप मोठी आहे. प्रत्येक गावात घराघरात प्रत्येकापर्यंत पोहोचवली चळवळ आहे. येणाऱ्या काळात शिव, शाहू ,फुले, आंबेडकर चळवळी बरोबर वारकरी चळवळीच्या सहकार्याने महाराष्ट्राला एक नवीन चकाकी देऊ आणि वारकरी चळवळ पुन्हा तेजदार करू असे प्रतिपादन यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले...